**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- VIII | ISSUE- V | MAY | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# नांदेड शहरातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावर कोविड -१९ परीणाम

**प्रा. डॉ. वैजयंता नागोराव पाटील**

शिक्षणशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

**सारांश :-**

*कोरोना ( कोविड १९ ) महामारीने जगात अशांतता निर्माण झाली आहे.युद्ध, राजकिय संकट, सामाजिक संकट, आजार, सारख्या बाबींना पुरून उरणारी मानवजात आज कोरोनासारख्या रोगामुळे आज बेचैन आहे. मंदिरे, मस्जिद, कारखाने, गुरूव्दारे सर्व बंद करण्यास भाग पाडले. मानवजात ही सर्वच संकटावर मात करून उरणारी आहे परंतु जवळजवळ वर्षभरापेक्षा जास्त काळ थैमान घातलेल्या या आजारावर कांहीच उपाय करता आले नाही. मानव मानवापासुन दूर जावू लागला होता. आपापसांतील नाते, संबंध विसरत चालला होता परंतु प्रत्येक गोष्टीला अंत असतेच, त्यामुळे अशा वाईट वृत्तीवर कदाचित ताबा मिळविण्यासाठी किंवा मानवातीमध्ये पुनश्च प्रेम,नाते, संबंध प्रस्थापित करण्यासाठी कदाचित कोरोनासारख्या आजाराने स्वतःचे आस्तित्व जगासमोर ठेवले. गरीबातील गरीब व श्रींमतातील श्रींमत व्यक्ती या आजारापासून मुक्तता मिळवू शकला नाही.*

*मानवातील प्रेमभावना, नातेसंबंध बिघडत चालले होते परंतू या गोष्टीला अंत असावा यासाठी कदाचित कोरोनाचा जन्म झालेला असेल. जीवनामध्ये सर्वचजन पैशाचे मागे धावत सुटले आहेत, पण पैसाच सर्वस्व असते असे काही नाही. पैशाचे मागे लागणाऱ्या व्यक्तीसाठी कोरोना हा मोठा धडा भेटला आहे. भूक लागली असताना पैशाचे बंडल/गठ्ठा सोबत असुन चालणार नाही कारण पैसा खाउ शकत नाही तर त्यासाठी श्रीमंत व्यक्तीलादेखील अन्नच खावे लागते, भुक लागल्यानंतर पैसा, सोने-उचयचांदी, हिरे मोती इत्यादी खाउ शकत नाही, पैशाने भुकेसाठी अन्न खरेदी करू शकतो व अन्नच खाउन भूक भागु शकते परंतू पैशाने भूक भागत नाही.*

*डिसेंबर २०१९ मध्ये चिनमध्ये या कोरोनाने जन्म घेतला तर आज मार्च २०२१ मध्येदेखील कोरोनाशी जग झुजतच आहे. २०२१ च्या नंतरची स्थिती काय असेल माहिती नाही, परंतु २०१९-२०२१ हा काळ खूप अचंबित करणारा काळ होता. भारतामध्ये फेब्रुवारी २०२० पर्यंत सर्व सुरळीत चालू होते, २२ मार्च २०२० पासूनच्या जनता कर्फ्यू पासून ते आजतागायत कोरोनाचे संकट आहे. यामुळे प्रत्यक्ष वर्गात बसुन घेतलेले शिक्षण ते ऑनलाईन शिक्षण हा एव-सजया मोठा बदल भारताबरोबरच इतर देशांनादेखील स्विकारावा लागला. प्रत्यक्ष शिक्षण ते ऑनलाईन शिक्षण मोठा बदल स्विकारण्याची मानसिकता व क्षमता आपल्याकडील विद्यार्थी, शिक्षक व पालकांकडे उपजत नव्हती तरीदेखील ती स्विकारावीच लागली. कारण ऑनलाईन शिक्षण हा पर्याय आपल्याकडे कदाचित नसता तर शिक्षण हे जवळजवळ दीड वर्ष बंद -हजयाले असते. त्यामुळे प्रत्यक्ष शिक्षणाला पर्याय म्हणून ऑनलाईन शिक्षणाला गवसणी घालण्यात आली. झुम मिटिंग, गुगल मिटिंग, गुगल क्लासरूम, एडमोडो, गुगल मिट, वेबेक्स इत्यादी सारखे नवीन पर्याय निर्माण झाले व भारतातदेखील शिक्षणाला खंड पडले नाही. प्रत्येक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना व शेवटच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना या गोष्टींचा त्रास झाला परंतु त्यांचे शिक्षण बंद पडले नाही. त्यामुळे या ऑनलाईन शिक्षणाची मानसिकता व क्षमता यावर खूप मोठ्या प्रमाणात प्रश्न निर्माण झाले परंतू सध्या अशाच गोष्टींतून सावरताना दिसत आहेत. कारण शिक्षण बंद करून तर चालणार नाही त्यामुळे कांहीजन याची मानसिकता करू शकले नाही व त्यांची क्षमतादेखील नव्हती परंतू नाइलाज असल्याने हा पर्याय स्विकारावा लागला.*

**प्रस्तावना :-**

कोरोना आणि त्यामुळे उद्‌भवलेल्या किंवा पर्यायी व्यवस्था म्हणून टाळेंबंदीचा स्विकार करावा लागल्याने कोरोना आणि त्यामुळे आलेल्या टाळेबंदीमुळे अनेक प्रश्न निर्मान -हजयाले आहेत. कोरोनानंतरच्या काळात शाळा कशा असतील, शाळा, शिक्षक, विद्यार्थी कशाप्रकारे अध्ययन-उचय अध्यापन करतील यावर विविध स्तरावरून व विविध व्यासपीठांवरून याची चर्चा घडताना दिसत आहे. त्यात प्रामुख्याने ऑनलाईन शिक्षण या मुद्दयावर भर आहे परंतु त्यापाठोपाठ असे प्रश्न निर्माण होतात. की ऑनलाईन शिक्षणाची काय गरज? किंवा अशा प्रश्नांची घाई कशाला? ऑनलाईन मंचाची खरोखरच गरज आहे का? ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारा पायाभुत सुविधाची

उपलब्धता आपल्याकडे आहे का? प्रत्यक्ष शिक्षणाच्या दृष्टीने आजपर्यंत आपण पावले उचलत आलो आहे. शाळेची मुख्य इमारत, पालक, विद्यार्थी, शिक्षक अशाप्रकारचा स्वप्नात विचार करू शकले नाहीत, आज अशा स्थितीत त्यांना अध्ययन-अध्यापनाचे कार्य करावे लागत आहे. कोविड- १९ ने फक्त शाळा, कॉलेज, महाविद्यालये यांच्यापु-सजयेच अशा प्रकारची प्रश्न उभे राहिलेत असे नाही तर सर्वच क्षेत्रात हे मूलभुत प्रश्न उभे राहिले आहेत. त्यामुळे कोविड- १९ ला शेक्षणिक क्षेत्रदेखील अपवाद नाही. कोरोनातंरतच्या काळात ऑनलाईन शिक्षणावर भर दिला जात आहे. भारताने देखील हे तंत्र आत्मसात करायला हवे. अशा तऱ्हेच्या चर्चा सुरू आहेत, या गोष्टींचा उहापोह करण्याची ही वेळ आहे. पण, प्रत्यक्ष वर्गात बसून घेतले जाणारे शिक्षण व ऑनलाईन शिक्षण हा खूप मोठा बदल आहे. तो स्विकारण्याची मानसिकता व क्षमता भरतात पालकांकडे आहे का? मोठा प्रश्न आहे. यामध्ये कोणत्याही भागाला किवा क्षेत्रात सुट नाही. शिक्षण, व्यापार, उद्योग, तंत्रज्ञान, औद्योगीक इत्यादी क्षेत्राला पूर्वीच्या पध्दतीला पूर्णविराम देवून त्याला पर्यायी मार्ग स्विकारण्याची वेळ सर्वावर आली आहे मुलांचे लक्ष एकाच गोष्टीकडे गुंतवणे ही महाकठिण गोष्ट आहे. त्यामुळे विविध स्तरावर विद्यार्थ्यांना कल, वय,स्तर पाहून तासिका ठरवल्या जात होते व वेळापत्रक बनवले जायचे, त्यामध्ये मूल्यशिक्षण, उपयोजीत शिक्षण, भाषाशिक्षण, आरोग्य, शिक्षण, शा. शिक्षण, प्रात्यक्षिके इत्यादी मुल्यांना हात लावला जात होता. त्यामुळे या सर्व गोष्टीवरून सध्या मुलांचे लक्ष एकाच गोष्टीवर गुंतवले जात आहे.

मुलांचे लक्ष एकाच गोष्टीवर गुंतवणे महाकठीण गोष्ट, निदान शाळेत मित्र, शिक्षक, शाळेचे वातावरण या कारणांमुळे तरी मुले काही प्रमाणात का होईना अभ्यासाकडे लक्ष देतात, घरात मात्र या सर्व वातावरणाचा अभाव असल्याने 'घरून शिक्षण' (लर्न फ्रॉम होम) या संकल्पनेनेच काम होईल, ते यशस्वी ठरेल का? अशा शंका उपस्थित होणे स्वाभाविकच आहे. (लर्न फ्रॉम होम) ही संकल्पना चांगली आहे, कारण घरबसल्या सर्व गोष्टी मिळतात त्यामुळे त्याचा फायदाच होतो परंतू शिक्षण ही अशी गोष्ट आहे. त्यासाठी छोट्या छोट्या गोष्टीवर मार्गदर्शक, शिक्षक, मित्राची गरज असते. ते वेळच्यावेळी पूर्ण होण्यासाठी प्रत्यक्ष शिक्षणाची आवश्यकता आहे. प्रत्यक्ष शिक्षणामुळे सर्वांगीण विकासाकडे वाटचाल होत असते व तीच्यावर लक्ष हे प्रत्यक्षपणे दिले जाते. लहान बालकांना एखादी गोष्ट करण्यापून जेव-सजये तुम्ही रोखाल तेवढे ते आणखी जास्त हट्टाने तीच कृती करतात. त्यामधे मोबाईल न घेणे, गेम न खेळणे, बाहेर न जाणे, टि.व्ही. न पाहणे, इत्यादी सुचना दिली असताना त्याच क्रिया त्या अगदी हट्टाने पुन्हा पुन्हा करतात. मोबाईल घेवू नको, असं बजावून सांगितले तरी ते या कोणत्यातरी त्या कारणाने मोबाईल घेतातच. याला सध्याच्या परिभाषेत स्कीन टाईम म्हणतात यांपासून लहान मुलांना फार काळ दुर ठेवणे शक्य होत नाही. टाळेबंदीमुळे घरात अडवून पडलेल्या बालकांना या स्कीन टाईमपासून कसे भरकटवायचे हा मोठा प्रश्न पालकांसमोर उभा आहे. परंतू सद्यास्थिती पाहता उलटी परिस्थिती आलेली आहे पूर्वी पालक सांगत की, मोबाईल ठेव अन् अभ्यास कर परंतु आत सांगावे लागते की मोबाईल घे अन् अभ्यास कर अशी उलट परिस्थिती निर्माण झालेली आहे. याचा प्रादुर्भाव हा भविष्यकाळात त्यांच्या जीवनावर नक्कीच होईल कारण पुर्वीचे लोक शंभर वर्षे आरामात जीवन जगायचे पण तो कमी होवुन सध्या साठवर येवून थांबले, परंतू हीच स्थिती पंचेचाळीस व्हायला वेळ लागणार नाही. सध्याच्या काळात बालके ही मोबाईल जास्त प्रमाणात वापरत आहेत, खेळ त्यांचा कमी -हजयाला आहे. त्यामुळे शारिरीक मजबुतपणा देखील कमी होताना दिसत आहे. हल्लीच्या काळात आंबेदेखील स्वतःहुन खाली पडत आहेत कारण त्यांनाही माहित आहे की मुलांचे दगड मारण्याचे दिवस गेले ते मोबाईल व टि.व्ही मध्ये व्यस्त आहेत त्याचे बालपण मोबाईमध्ये व टि.व्ही मध्ये व्यस्त आहे. विनोदाचा भाग वगळता ही वस्तुस्थिती आहे. उलटपक्षी असाही विचार करणारे आहेत की, आपण आपल्या दैनंदिन जीवनात थोडा बदल करण्यात थोडे जरी यशस्वी ठरलो आणि लहान मुलांच्या कलेनुसार घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांचा स्कीन टाईम कमी करता येईल. त्याचे गॅजेट्सवरील अवलंबित्व कमी केले तर पालक आणि कुटूंबातील इतर सदस्यांबरोबर त्यांचे नाते आणखी दृ-सजय होण्यास मदत होईल. मात्र अल्प उत्पन्न गटातील पालक आणि विद्यार्थ्यांच्या बाबतील हे अगदी जसेच्या तसे घडेल याची शाश्वती नाही.

आधुनिक विचारांच्या आणि सुशिक्षित पालकांच्या मते घरच्या घरी शाळा हा पर्यायी योग्य आहे व तो पारंपारीक आहे. त्यातील अनेकांना आता या कोरोना संकटाच्या काळात हा पर्याय योग्य वाटत नाही. मात्र, या घरातील शाळांचे अनेक फायदे असले तरी ते वास्तवात कमी का जास्त प्रमाणात परिणामकारक ठरतात ते व्यक्त करता येत नाही. शाळांकडून येणाऱ्या माहितीत मोलाची भर घालून त्यांना परिपूर्ण करण्याच्या पालकांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करून चालणारे नाही.

मुलांना गणितासारखा अवघड विषय सोपा करून सांगताना वेगवेगळी उदाहरणे देण्याकडे पालकांचा कल असतो.

त्याचप्रमाणे इतिहासाचे धडे समजावुन सांगण्यासाठी ऐतिहासिक संस्थांना प्रत्यक्ष भेटी देवून त्या माध्यमातून मुलांना इतिहास समजावून सांगण्यासाठी हल्लीचे पालक आग्रही असतात.

ज्ञान आणि कौशल्यांबरोबरच पालकांच्या दिमतीला हल्ली ऑनलाईन साहित्यही असते. परंतू असे असले तरी प्रत्येकाच्या बाबतीत या 'घरातील शाळा' हा उपक्रम यशस्वी ठरला का? हा यक्षप्रश्नच आहे. अनेकदा खूप कुटूंबामध्ये काही प्रमाणात अशा काही कमतरता असतात की ज्यामुळे शिक्षणाचे स्वरूप कसेही असो, त्या कमतरतांमध्ये बदल करता येतच नाही लांबलेल्या सुट्टयामुळे अल्प उत्पन्न असलेल्या कुटूंबामधील मुलांच्या शैक्षणिक सत्रातील यशाचे नुकसान झाल्याचे काही अभ्यासातुन पुढे आले आहे अशा प्रकारे शिकवण्याच्या वेळांमध्ये बदल होवून व पालकांना उपलब्ध असलेल्या साधनामध्ये बदल होवून अनेक पालकांना या पद्धीसाठी आवश्यक असे ऑनलाईन साहित्य मिळविणेही दुरापास्त होवून आणि त्याचा अंतिम परीणाम विद्यार्थ्यांच्या ज्ञानाजर्नावर होईल. त्यामुळे ऑनलाईन अभ्यासाच्या शर्यतीतुन अशा प्रकारचे विद्यार्थी स्पर्धेतुन बाद होतील. या ऑनलाईन वर्गाची मागणी जसजसी वाढत जाईल, तसतसा ऑनलाईन शिकवणीच्या व्यवसायात गुतलेल्या कंपन्यांचे प्रस्थ वाढू लागेल. एक असा टप्पा येईल की, सुरूवातील मोफत ऑनलाईन शिक्षण देणाऱ्या या कंपन्या त्यांच्या सेवांसाठी चांगला दाम मोजून घेतील ऑनलाईन शिक्षण देणाऱ्या या कंपन्यामुळे व त्यांच्या अव्वाच्या सव्वा शुल्कामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांना हे ऑनलाईन शिक्षण परवडणार नाही. त्यामुळे शाळा स्तरावर तंत्रज्ञानावर अति अवलंबित्व आणि वर्गातील सत्रांमध्ये घट, विशेषतः शहरी भागांस, या गोष्टीमुळे शालेय शिक्षण दुर्मिळ होईल आणि त्यामुळे अल्प उत्पन्न असलेल्या कुटूंबातील मुलांना तर प्राथमिक शिक्षण घेण्यातही अडथळे निर्माण होतील. इंटरनेटच्या कमी जोडण्या (२०१९ मध्ये ३६%) आणि वापरकर्त्यांमधील सामाजिक दरी यामुळेही शालेय शिक्षणाची दैनावस्था होईल या सर्व घटका व्यतिरिक्त इतर घटकही आहेत जे अल्प उत्पन्न आणि उच्च उत्पन्न कुटूंबातील मुलांमधील शिक्षणाची दरी रूंदावत आहेत. अल्प उत्पन्न कुटूंबातील मुलांची कौटूंबिक परिस्थिती घरांतील शाळांसाठी पोषक नसते. सामान्यताः ऑनलाईन शिक्षणासाठी संगणक आणि इंटरनेट जोडणी या दोन मुलभूत गोष्टीची आवश्यकता असते. मात्र भारतात आज अशी कोट्यावधी कुटूंबे आहेत की, ज्यांना इंटरनेट जोडणी परवडत नाही. तसेच या कुटुंबातील मुलांना धड गृहपाठ करण्याइतकीही मोकळी जागा घरात उपलब्ध नसते. शिवाय क्रमीक पुस्तकांची वानवाही त्यांना पाचवीला पुजलेली असते.कित्येकांना तर चार भिंतीचे घरदेखील नशीबात नसते. गाव. घर दार सोडून रोजगाराच्या सोबत शहराकडे धाव घेणाऱ्या स्थलांतरीत मजूरांच्या मुलांना तर त्यांचे आई वडील गावीच सोडून जातात. अशा मुलांच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्या आजी आजोबावर येते सामान्यतः आजी आजोबा फार शिकलेले नसतात. त्यामुळे मुलांच्या गृहपाठात ते सहकार्य करू शकत नाहीत. त्यामुळे अल्प उत्पन्न कुटूंबातील मुलांना कौटूंबिक परिस्थितीमुळे त्यांचा अभ्यास आणि अभ्यासक्रम पूर्ण करण्यात अनंत अडचणी येतात परिणामी ते अभ्यासात मागे पडतात. कोरोना संकटामुळे अभूतपूर्ण अशी आर्थिक मंदी येणे अपरिहार्य आहे. वाढती बरोजगारी आणि अन्नाची भ्रांत मुलांचा छळ बालविवाह या अनिष्टतेच्या चक्रात अडकु शकतात. या कोरोना संकटाच्या काळात अनेक अल्पवयीन मुलांचे हेल्पलाईन क्रमांकावर मदत मागितली. यावरून मुलांच्या विद्यार्थ्यांच्या छळाला सुरूवात झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे मुलांना जरी इंटरनेट जोडणी आणि इरत आवश्यक गॅजेट्स दिली गेली तरी त्यांच्या घरातील वातावरण ऑनलाईन शिक्षणासाठी पोषक असेलच असे नाही. त्यातच अनेक मुलांना कोरोना संकट ओसरल्यानंतर मजुरीच्या कामांना जुंपले जाण्याची शक्यताच आधिक आहे. त्यामुळे शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या घटू शकते. त्यामुळे दीर्घकाळ सर्व व्यवहार बंद राहण्याचा मुलांच्या शारीरिक आणि मानसिक अवस्थेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कोरोना संकटाच्या काळात धोरणकर्त्यांना कुपोषण आणि मुलांचे शिक्षण या दोन समस्या तीव्रपणे भेडसावत आहेत. शाळेत मिळणाऱ्या आहारावरच जर गदा येणार असेल तर शाळेत जाने तरी का? असा प्रश्न मुलांना पडण्याची शक्यता आहे. तेव्हा हा भयगंड मोठ्या प्रमाणत मुलांमध्ये निर्माण होवू शकतो, असा भयगंड निर्माण होवू नये यासाठी सरकारने मुलांना शाळांमध्ये पोषण आहार मिळेल याची सास्वती द्यावी केवळ पश्चिम बंगाल, दिल्ली आणि आंध्रप्रदेश या राज्यांच्या सरकारांनी याबाबतीत वेळीच योग्य पाऊल उचलले आहे. मुलांच्या शाळा बंद असल्या तरी त्यांना घरपोच मध्यान्न भोजन प्राप्त होईल. याची तजवीज या राज्यांनी अंगणवाडी सेविकाच्या माध्यमातुन सुरू ठेवली आहे. शिक्षकांनी संगणक, वायरलेस, इंटरनेट, किंवा अभ्यासाठी समर्पित ठिकाण या सुविधांशिवाय विद्यार्थ्यांना विद्यादान कसे करता येईल, या दृष्टीने अभ्यास करून त्या पद्धतीने अभ्यासवृत्तीची रचना करावी, असा विचार आता पुढे येवू लागला आहे. दुरस्थ शिक्षण म्हणजे

फक्त ऑनलाईन शिक्षण असे नाही तर संमिश्र माध्यमातुन शिक्षण होय, अशा प्रकारच्या शिक्षणाने उदिष्ट्य टि.व्ही. रेडीयो, आणि लघुसंदेश सेवा या माध्यमांतुन अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे हे असते. टिव्हीद्वारे मुलांना शिक्षण देण्याच्या प्रक्रियेला पश्चिम बंगालमध्ये सुरूवात देखील याली आहे. महाराष्ट्रातही असा प्रयोग राबविण्याचा विचार शासन पातळीवर गांभीर्याने केला जात असल्याचे वृत्तपत्र व बातमीच्या माध्यमातून समजते. साक्षरता आणि सामाजिक आर्थिक दर्जा यांच्या पलीकडे जावून त्यात प्रत्येक पालक किंवा कुटूंब त्यांच्या पाल्याच्या शिक्षण प्रक्रियेत सहभागी होत आहे. पाल्याला मदत करू पाहत आहे. आपल्या पाल्याचे शिक्षण आधिकाधिक सुकर कसे होईल, यावर पालक भर देवू लागले असून ते एसएमएस सेवा, टिव्ही आणि रेडियो या माध्यमांचा आधिक खुलेपणाने वापर करू लागले आहेत. कोरोनाचा प्रभाव ओसरू लागला की, अनेक शाळा,विद्यालये कोरोनामुळे अभ्यासापासून वंचित राहिलेल्या सामाजिक-उच्चआर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी/हिवाळी शाळा, शिबीरे भरवतील. तसचे विद्यार्थ्यांचे लहान लहान गट करून त्यांच्यासाठी जादा वर्ग किंवा नियमित शिकवण्या सुरू केल्या जातील कोरोनाकाळात अनेक शाळांनी त्यांच्या वार्षिक परीक्षा रद्द केल्या आहेत. त्यामुळे वर्षभरातील कामगिरीच्या आधारावरच मुलांचे मूल्यमापन केले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या मुल्यमापनातून त्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणी ओळखता येतात तसेच शिकवण्याचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम पाहता येतो, त्यामुळे शाळांनी विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करावे, या प्रक्रियेला तरी पूर्णविरात देवू नये, तसचे सरकारनेही शालेय विद्यार्थ्यांच्या कुटूंबियांना नियमित आर्थिक आधार उपलब्ध करून द्यावा धोरणांची आखणीही अशा पद्धतीने केली जावी की, ऑनलाईन पद्धतीने शिक्षण क्षेत्रातील उपाययोजना सादर करणाऱ्या संस्थाना पूर्ण मोकळीक देवून त्यांना संपूर्ण शिक्षण पद्धतीच अधिपत्याखाली घेतली दिली जावू नये. तसेच धोरण निश्चितीतही सर्जनशीलता, शैक्षणिक स्वातंत्र्य, सर्वसमावेशकता आणि ना नफा किंवा राजकीय प्रभावापासुन दूर राहणे इत्यादी घटकांना प्राधान्य द्यायला हवे.

नांदेड शहरातील प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षणाला कोरोनाकाळात विपरीत परिणाम याला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. शहरी भागात कमी प्रमाणात परिमाण झाल्याचे दिसून आले. नांदेड शहरातील लोकसंख्येचा विचार केला तर शक्यतो स्थलांतर वाढलेली संख्या जास्त प्रमाणात आहे. शहराच्या आजूबाजूला असणाऱ्या खेड्यांची संख्या जास्त प्रमाणात असल्याने मूलांच्या भविष्याच्या शोधार्थ व कल्याणासाठी त्यांनी नांदेडची वाट धरलेली आढळून येते. शेती हा मुख्य व्यवसाय असतानादेखील शेतीच्या उत्पन्नाच्या बळावर मुलांना केवळ शिक्षणासाठी नांदेड शहरात स्थानापन्न करण्यात आले.

अकरावी व बारावीचा विचार केल्यास नांदेड, लातूर व औरंगाबाद या शहरामध्ये गर्दी होताना दिसते वृत्तपत्राच्या माध्यमातून अशा प्रकारच्या बातम्या वाचण्यास मिळतात. नांदेड शहर तर ट्यूशनच्या बाबतीत राजधानीचे शहर बनले आहे. त्यामुळे कोरोनाकाळात देखील प्राथमिक शिक्षण जास्त चालले नाही, परंतू माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाबरोबर विद्यापिठीय शिक्षणदेखील नांदेड शहरातील थांबलेले नाही. ऐन कोरोनाकाळात शैक्षणिक वर्ष संपत आले असताना त्याच वर्षामध्ये सहामाही व वार्षिक परीक्षेचे नियोजन करून परीक्षा देखील ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या व त्या यशस्वीरीत्या पार देखील पडले. प्रत्यक्ष शिक्षणाची जागा ऑनलाईन शिक्षण घेवू शकत नाही परंतू, पर्यायी मार्ग योग्य आहे. शिक्षण थांबवणे चूकीचे ठरेल, जगासोबत आपणसही चालायचे असेल तर या परिस्थितीवर मात करण्यासाठी ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग योग्य राहील. नांदेड शहरामध्ये प्राथमिक शिक्षणाला जास्त महत्व देण्यात आले नाही कारण दिवाळीच्या काळात सुरूवातीस फक्त नववी ते बारावी पर्यंतचे वर्ग सुरू करण्यात आले त्यानंतर पाचवी ते आठवी, परंतू सुरूवात करताना सरसकट केली गेली नाही कारण त्यांच्या वयाचा विचार करण्यात आला. कोरोकाळात सर्वच शाळा बंद होत्या परंतु ऑनलाईन क्लास शिकवणी चालू होते तेव्हा पालक फक्त दहावी व बारावीच्या पाल्याचे क्लास, शिकवणी लावले परंतू पहिली ते पाचवी किंवा आठवी पर्यंतचे लावू शकले नाहीत.

**समारोपः-**

नांदेड शहरामध्ये कोरोनाकाळात परिस्थिती बदलली कारण सुरूवातीच्या काळात एकही कोरोना पेशंट नसणारा जिल्हा पुन्हा दररोज एक हजाराच्या वर पोहोचला. त्यामुळे धोरणांची आखणी आणि निश्चिती केली जात असताना घरच्या आघाडीवर पालकांनी मुलांवर पुरेसे लक्ष ठेवत त्यांच्यावर या अभ्यासाच्या पूर्णपणे नवीन स्वरूपाची सक्ती न करणे गरजेचे आहे. असेही होउ शकते की मूले स्व-अभ्यासांत स्वतःला गुंतवू पाहतील किंवा नवीन छंद जोपासतील अथवा वेळापत्रकाच्या दृष्टीकोनातुन प्रत्येक गोष्टीकडे न पाहता नवनवीन गोष्टी शिकण्याकडे कल असू शकतो. तेव्हा विद्यार्थ्यांचा कल पाहून व त्यांची आवड लक्षात घेवून शिक्षकाने त्यांना योग्य मार्गदर्शन

करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव द्यावा. माहिती तंत्रज्ञांच्या जगात वावरताना विद्यार्थी घरकोम्बडा बनून चालत नाही तर समाजामध्ये सामील होऊन जगात काय चालत आहे याचा विचार करणे आवश्यक आहेण्मोबाईल हे सध्याच्या काळात गरजेचे झालेले आहे परंतु त्याचा दुरुपयोग होता काम नये यांच्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे गूगल मीट झूम वेबेक्स फेसबुक यूट्यूब इत्यादी साधने व माध्यम झाली आहेत यांचयाबरोबर चालत राहणे हे साध्याघाडीचे काम आहे त्यामुळे याचा सरासरीपेक्षा जास्त उपयोग झाला तर व्यसन बनून विद्यार्थी घडण्याऐवजी बिघडतील याची पालकांनी काळजी घेणे महत्वाचे आहे

## संदर्भग्रंथसुची

१. कोरोना : शिक्षणाची संधी का सावट
२. शिवणेकर ल.मा. : माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपद्धती (नुतन प्रकाशन, पुणे.)
३. पवार ना.ग. : भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह (नुतन प्रकाशन, पुणे.)
४. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सद्यास्थिती : गिरीश कुबेर ( संपादक, लोकसत्ता )